बीपी/रावेत/०२/२०१६ दि. ०७/०१/२०१६

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८.

(या पुढील व्यवहारात क्रमांक व दिनांक यांचा उल्लेख करावा)
([illegible])
(कमेन्समेंट सर्टिफिकेट)

सुधारित **बांधकाम चालू करणेकरिता दाखला**

सदर बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ ची कलम ४५ मधील तरतुदीप्रमाणे आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ ची कलमे (सेक्शन्स) २५३ व २४५ मधील तरतुदीप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.

अर्ज क्र.- १०३२१९२०००००६६०३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
क्रमांक – बी.पी./ रावेत /२४ /२०२०
दिनांक : १४ /०२ /२०२०

~~श्री./श्रीमती/मे. एफ.जी. एम असो. तर्फे भागीदार दिलीप लालचंद मनाई व रामदास वसंतराव गावडे लिमि. बिल्डर्स तर्फे दिलीप लालचंद मनाई व सौ. सुनिता चौधरी~~
~~द्वारा : ला. आ. / ला. स. श्री. विकास अचलकर गायकवाड~~
~~१२२९, बी/१ ऑफिस परांजपे रोड, एल.बी.रोड पुणे-०४~~ यांना
पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम (सेक्शन्स) २५३ व २५४ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सीमेतील मौजे – रावेत येथील सर्व्हे नं. ६४/३/१ व ६४/४/१ .......... सिटी सर्व्हे नं. ............
प्लॉट नं. .......... मधील बांधकाम करण्यासाठी तुम्ही महानगरपालिकेला अर्ज दाखल केला तो दिनांक १३/०२/२०२० रोजी प्राप्त झाला. यावरून बांधकाम करण्यास खाली नमूद अटींवर व जादा अट क्र. ....—.... ते ....—.... नुसार तुम्हास संमतीपत्र देण्यात येत आहे.

१) सोबतच्या मंजूर नकाशात दाखविल्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर बांधकाम करणे बंधनकारक आहे.
२) जोत्यापर्यंत काम आल्यानंतर नगररचना व विकास विभागाकडून सेटबॅक तपासून घ्यावेत. त्याशिवाय जोत्यावरील काम सुरू करू नये.
३) सोबतच्या नकाशावर नमूद करण्यात आलेल्या अटींवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.
४) ज्या भूखंडावर नवीन इमारत बांधकाम करण्यात आले आहे त्या इमारतीच्या भोगवटा दाखला मागण्यापुर्वी विकसकाने इमारतीसमोर कंपाउंड वॉलच्या आत व बाहेर झाडे लावून ती व्यवस्थित वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था करावी त्या शिवाय भोगवटा दाखला मिळणार नाही. रस्त्यावरील झाडांना जरूर ते संरक्षण कुंपण विकसकाने करावयाचे आहे. तसेच महानगरपालिकेच्या प्रचलित नियमानुसार योग्य ती अनामत रक्कम कोषागारात भरणे बंधनकारक आहे.
५) इमारतीचा भोगवटा दाखला देताना रस्त्यावरील व आतील बाजूस टाकण्यात आलेला इमारतीचा राडारोडा उचलून जागा साफ केल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही.
६) नवीन बांधकाम सुरु करताना संबधित जागेमध्ये झाडे आल्यास ती ट्री ॲथॉरिटीची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय तोडू नयेत. अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येते, यांची नोंद घ्यावी.
७) आपण संबधित बांधकाम हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदींचा भंग करून सक्षम अधिकाऱ्याची पूर्व परवानगी न घेता सुरू केल्याबद्दल/तसेच इकडील मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम न करता त्यात बदल व फेरफार करून या बांधकामाचे सुधारित नकाशास पूर्व परवानगी न घेता बांधकाम केल्याबद्दल इमारतीचे भोगवटापत्रक केल्याबद्दल, आपणा विरूध्द नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्याचा म.न.पा. चा हक्क राखून ठेवला आहे.
८) बांधकाम साहित्य अथवा जुन्या बांधकामचा निघालेला राडारोडा सार्वजनिक रस्त्यावर मनपा चे परवानगी शिवाय ठेवता येणार नाही. जर हे साहित्य सार्वजनिक जागेवर ठेवल्याचे आढळल्यास त्यासाठी सुधारित विकास नियंत्रण नियमावलीत तरतुदीनुसार रू ३०००/- प्रति दिन याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
९) पाणी पुरवठा, जलनि:सारण, उद्यान, अग्निशामक इत्यादी आवश्यक विभागाचे ना हरकत दाखले इकडे सादर करावेत.
१०) इमारतीच्या तळमजल्यावर गाळेधारकाच्या नावे दर्शविलेली टपालपेटी सुयोग्य ठिकाणी बसविणे बंधनकारक राहील.
११) विकास आराखड्यातील रस्ता रूंदीने बाधीत क्षेत्र नियमानुसार महानगरपालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे.